# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः08.12.2025** **वारःसोमवार**

---

1. सांस्कृतिक वारसा जपत देशाचा 'विकास भी, विरासत भी'-पंतप्रधानांचं प्रतिपादन
2. लोकसभेत आजपासून राष्ट्रीय गीत वंदे मातरमच्या 150 व्या वर्धापन दिनानिमित्त विशेष चर्चा
3. गोवा नाईटक्लब दुर्घटनाप्रकरणी तीन अधिकारी निलंबीत आणि चार जणांना अटक आणि
4. छत्तीसगड, मध्य प्रदेश, ओडिशा आणि विदर्भाच्या काही भागात थंडीची लाट

**पंतप्रधान**

भारताचे 'विकास भी, विरासत भी' हे ब्रीदवाक्य म्हणजे आधुनिकीकरण आणि शहरीकरण करतानाच देशाची सांस्कृतिक वारसा जपण्याची वचनबद्धता आहे अशी खात्री पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल व्यक्त केली. संयुक्त राष्ट्रांच्या वारसास्थळांच्या संवर्धनासाठी असलेल्या आंतरसरकारी समितीच्या 20 व्या सत्राच्या उद्घाटन समारंभाच्या पार्श्वभूमीवर पंतप्रधानांनी हा संदेश दिला आहे. नवी दिल्ली इथं आजपासून सहा दिवसांच्या सत्राचं आयोजन करण्यात आलं आहे. परंपरा जपताना कोणताही समुदाय अथवा कोणाचीही श्रध्दा लोप पावणार नाही याची काळजी घेतली जात असल्याचं ते म्हणाले.

भारतासाठी वारसा कधीही जुन्या आठवणींचा विषय राहिला नाही, तर तो ज्ञान, सर्जनशीलता आणि विविध समुदायाच्या विश्वासाचा प्रवाहाची जिवंत वाहणारी नदी आहे. संस्कृती केवळ स्मारकं उभारून किंवा हस्तलिखितांनी समृद्ध होत नाही तर ती पारंपरिक सण, कला आणि कारागिरीची जपणूक करत भरभराटीला येते या समजुतीने भारताचा संस्कृतीचा प्रवास आकाराला आला आहे. असे गौरवोद्गारही मोदी यांनी काढले.

अमूर्त सांस्कृतिक वारशाच्या संरक्षणासाठी आंतरसरकारी समितीचे 20 वे सत्र आज नवी दिल्लीतील लाल किल्ल्यावर सुरू होत आहे. या सत्राचे अध्यक्षपद युनेस्कोमधील भारताचे राजदूत आणि कायमस्वरूपी प्रतिनिधी विशाल व्ही. शर्मा यांच्याकडे असेल. भारताने यावर्षी युनेस्कोच्या अमूर्त वारसा यादीसाठी प्रकाशाचा सण दिवाळीला नामांकित केलं आहे. यासाठी मूल्यांकन संस्थांनी यापूर्वी पुनरावलोकन केलेल्या या प्रस्तावावर अधिवेशनादरम्यान चर्चा केली जाईल असं केंद्रीय संस्कृती आणि पर्यटन मंत्री गजेंद्र सिंह शेखावत यांनी म्हटलं आहे.

**भारत-युरोपीय-संघ**

भारत आणि युरोपियन संघांदरम्यान आज नवी दिल्लीत मुक्त व्यापार करार अर्थआत एफटीए वर चर्चा पुन्हा सुरू होणार आहे. दोन दिवसांच्या या संयुक्त सत्रादरम्यान युरोपिअन संघटना आणि भारत यांच्यातील मजबूत आर्थिक संबंध दृढ करण्याच्या दीर्घकालीन प्रयत्नात आणखी एक पाऊल असेल. भारतातील युरोपिअन संघटनेचे राजदूत हर्वे डेल्फिन यांनी ईयू-भारत एफटीए चर्चेचा हा दुसरा टप्पा असल्याचं म्हटलं आहे.

**वंदे मातरम**

लोकसभेत आजपासून वंदे मातरम या राष्ट्रीय गीताच्या 150 व्या वर्धापन दिनानिमित्त विशेष चर्चा सुरू होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी लोकसभेत चर्चेला सुरुवात करतील. चर्चेसाठी दहा तासांचा वेळ देण्यात आला आहे. लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सर्वपक्षीय बैठकीत आज वंदे मातरम गीतावर चर्चा आणि उद्या निवडणूक सुधारणांवर चर्चा करण्याचा निर्णय घेण्यात आला असल्याची माहिती संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी दिली.

**काशी-तमिल संगमम**

काशी तमिळ संगमम एक भारत श्रेष्ठ भारत या दृष्टिकोनाचे मूर्त रूप आहे. काल वाराणसीमध्ये आलेल्या तामिळनाडूतील तमिळ पाहुण्यांच्या चौथ्या गटाचे भव्य स्वागत करण्यात आले. लेखक आणि माध्यम व्यावसायिक गटाने बीएचयू येथील आंतर-संस्कृती अभ्यास केंद्राला भेट दिली आणि संस्थेच्या वतीने जोपासण्यात आलेल्या समृद्ध शैक्षणिक आणि सांस्कृतिक ठेवा अनुभवला. श्रीरणवीर संस्कृत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी पुरुषसूक्ताचे गायन करत मंगलाचरण करून शिक्षक प्रतिनिधींचे स्वागत केले. नंतर नमो घाट इथं सांस्कृतिक सादरीकरण झालं. यामध्ये काशी आणि तमिळनाडूच्या सामायिक वारशाचे उत्सव साजरे करणारे संगीत, ताल आणि सादरीकरणं करण्यात आलं. लेखक आणि व्यावसायिक गटाने शंकराचार्य मठालाही काल भेट दिली.

**गोवा**

गोव्यातील नाईटक्लब दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर गोवा पोलिसांनी या क्लबचे महाव्यवस्थापक आणि तीन कर्मचाऱ्यांसह चार जणांना अटक केली आहे. पोलिसांनी नाईटक्लबच्या मालकांसह व्यवस्थापक आणि कार्यक्रम आयोजकांविरुद्ध काल एफआयआर दाखल केली त्यानंतर पोलीसांनी या चार जणांना अटक केली. क्लबच्या मालकाचा शोध सुरु आहे. या क्लबमध्ये शनिवारी रात्री लागलेल्या आगीत 25 जणांचा मृत्यू आणि सहा जण जखमी झाले आहेत. गोवा सरकारने रोमियो लेन इथल्या बिर्च नाईटक्लबला परवानगी देण्यात त्रुटी आढळल्याबद्दल तीन अधिकाऱ्यांना निलंबित केलं आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळ, पंचायत संचालक आणि हडफडे-नागवा पंचायतीचे सचिव यांना निलंबित करण्यात आलं आहे. मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी 5 लाख रुपये आणि जखमींना 50 हजार रुपये सानुग्रह अनुदान मुख्यमंत्र्यांनी काल जाहीर केलं. पंतप्रधान सहायता निधीतून मृतांच्या निकटवर्तीयांना 2 लाख रुपये आणि जखमींना 50 हजार रुपये मदत यापुर्वीच जाहीर करण्यात आली आहे.

**हिवाळी-अधिवेशन**

कर्नाटक आणि महाराष्ट्र विधानसभेचं हिवाळी अधिवेशन आजपासून सुरु होत आहे. महाराष्ट्र विधानसभा अधिवेशन नागपूर इथं होणार आहे. ते आठवडाभर चालेल. राज्यातल्या सर्व लोककल्याणकारी योजना पूर्ण करण्यासाठी राज्य सरकारकडे निधी उपलब्ध असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल नागपूर इथं घेतलेल्या पत्रकार परिषदेत सांगितलं.

**भारत-चीन**

भारत आणि चीनदरम्यानचे आर्थिक आणि परस्पर हितसंबंध मजबूत करण्याच्या उद्देशाने भारताने शांघायमध्ये एक नवीन वाणिज्य दूतावास सुरु केला आहे. चीनमधील भारताचे राजदूत प्रदीप कुमार रावत आणि कॉन्सुल जनरल प्रतीक माथूर यांनी वाणिज्य दूतावासाच्या नवीन परिसराचे काल उद्घाटन केलं. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सर्वसमावेशक विकासाच्या दृष्टिकोनाचे प्रतिबिंब असल्याचं दुतावासानं म्हटलं आहे. 32 वर्षांनंतर नवीन वाणिज्य दूतावास स्थापन्याचं हे पहिले पाऊल आहे.

**नक्षली**

मध्य प्रदेशातील बालाघाट भागात 77 लाख रुपयांचं बक्षिस असलेला सुरेंद्र उर्फ कबीर या माओवाद्यासह 10 जणानी मुख्यमंत्री डॉ मोहन यादव यांच्या समोर काल आत्मसमर्पण केलं. राज्य सरकार मध्य प्रदेशला नक्षलवादी हिंसाचारापासून मुक्त करण्यासाठी वचनबद्ध आहे. सरकारच्या पुनर्वसन धोरणामुळे दिशाभूल झालेल्या व्यक्तींना मुख्य प्रवाहात परत येण्यासाठी, सन्मानाने समाजात पुन्हा एकरूप होण्यासाठी मार्ग मोकळा झाला आहे. असं डॉ मोहन यादव यावेळी बोलताना म्हणाले.

**जम्मू-काश्मिर**

जम्मू आणि काश्मीरमध्ये दोडा जिल्ह्यातील जंगलात दहशतवाद्यांचा एक अड्डा काल उध्वस्त करण्यात आला. स्थानिक पोलिस आणि सीआरपीएफच्या विशेष अभियानाअंतर्गत बलारा इथल्या वनक्षेत्रात संयुक्तपणे ही कारवाई करण्यात आली. रात्री उशारापर्यंत शोध मोहीम सुरू होती. अधिक तपशीलांची प्रतिक्षा आहे.

**<u>राजनाथ-सिंग</u>**

लडाखमधील श्योक बोगदा कडक हिवाळ्यात तसंच सर्व हवामानातील दळणवळण, गतिशीलता कायम ठेवणारा आणि परिस्थिती बदलवणारा दुवा ठरेल असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काल केलं. लेहमधील श्योक बोगद्यासह सात राज्ये आणि दोन केंद्रशासित प्रदेशांमध्ये सीमा रस्ते संघटनेने बांधलेल्या 125 पायाभूत सुविधा प्रकल्पांचे उद्घाटन केलं. यावेळी ते बोलत होते.

**<u>नागरी हवाई वाहतूक निर्देश</u>**

देशांतर्गत विमान वाहतूक सेवा पूर्ण क्षमतेने, सुरळीतपणे सुरू असल्याचं आणि इंडिगोच्या कामगिरीतही सुधारणा होत असल्याचं काल नागरी विमान वाहतूक मंत्रालयातर्फे सांगण्यात आलं. विमान प्रवासाच्या वाढत्या किंमतींवर नियंत्रण ठेवण्यासाठी कमाल प्रवासभाड्याची मर्यादा ठरवण्यात आली असून त्याची तत्काळ प्रभावानं अंमलबजावणी केली जाणार आहे. रद्द झालेल्या अथवा वारंवार विलंब झालेल्या विमानांच्या प्रवासभाड्याची रक्कम परत देण्याचे आणि प्रवाशांच्या हरवलेल्या सामानाचा शोध घेऊन ते 24 तासांत त्यांना परत देण्याचे आदेश इंडिगो कंपनीला देण्यात आले आहेत. तसंच प्रवासभाड्याबाबतच्या नवीन नियमावलीचं काटेकोर पालन करण्याच्या सूचनाही मंत्रालयानं सर्व विमान कंपन्यांना दिल्या आहेत.

**<u>रेल्वे</u>**

इंडिगो विमानसेवा विस्कळीत झाल्याच्या पार्श्वभूमीवर, प्रवाशांची वाढती मागणी पूर्ण करण्यासाठी दिल्लीसह देशभर 22 विशेष रेल्वेगाड्या चालवण्याचा निर्णय मध्य रेल्वेनं घेतला आहे. पश्चिम रेल्वेने मुंबई सेंट्रल आणि नवी दिल्ली दरम्यान एक विशेष सुपरफास्ट ट्रेन सुरू करण्याची घोषणा केली आहे.

**<u>अपघात-नाशिक</u>**

महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यात वणी इथल्या सप्तश्रृंगी देवी गडाजवळ मोटार दरीत कोसळून सहा जण ठार झाले आहेत. काल संध्याकाळी हा अपघात घडला. गडाच्या संरक्षक कठड्याची भिंत तोडून ही मोटार सुमारे हजार फूट खाली खोल दरीत कोसळली. अपघातातील सर्व मृत व्यक्ती नाशिक जिल्ह्यातील पिंपळगाव बसवंत गावातील रहिवासी आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल तीव्र दु:ख व्यक्त केलं आहे.

**<u>फुटबॉल</u>**

ए आय एफ एफ सुपर कप अजिंक्यपद फुटबॉल स्पर्धेत एफसी गोवा संघानं विजेतेपद मिळवलं आहे. काल गोव्यात झालेल्या अंतिम फेरीच्या सामन्यात गोवा एफसी संघानं इस्ट बंगाल संघाचा पेनल्टी शूट आऊटमध्ये 6-5 असा पराभव केला. या विजयामुळे गोवा एफसी संघाला 2026-27 मध्ये होणाऱ्या एएफसी अजिंक्यपद स्पर्धेत स्थान मिळालं आहे.

**<u>हवामान</u>**

छत्तीसगड, मध्य प्रदेश, ओडिशा आणि विदर्भाच्या काही भागात थंडीची लाट येण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. अंदमान आणि निकोबार बेटे, तामिळनाडू पुडुचेरी आणि कराईकल इथं काही ठिकाणी वादळ आणि विजांचा कडकडाट होण्याची शक्यता आहे.  पुढील चार दिवस आसाम, मेघालय, हिमाचल प्रदेश, नागालँड, मणिपूर, मिझोरम, त्रिपुरा आणि ओडिशा इथल्या काही ठिकाणी दाट धुक्याची परिस्थिती राहण्याचा अंदाज वर्तवला आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं

# नमस्कार